Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**10th June 2019 Special Issue - 93**

# Research need of the Hour
# संशोधन काळाची गरज

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Dr. Ulgade Laxman Kashinath**
Asst. Prof. and Head, (PG Teacher)
Dept. of Public Administration
Shri Havagiswami College, Udgir, Dist. Latur

**Co-Editor**
**Mr. Madhav Kashinath Ulgade**

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

214-20

| | | |
|---|---|---|
| 52 | 'संशोधन काळाची गरज'<br>**प्रा. डॉ. लक्ष्मण काशिनाथ उलगडे** | 180 |
| 53 | बौध्दांच्या समस्या आणि उपाययोजना<br>**संतोश विठोबा गवई, डॉ. किषोर उत्तमराव राऊत** | 182 |
| 54 | चिखली तालुक्यातील आमखेड गावात वास्तव्य करणाऱ्या अनुसूचीत जातीमधील बौध्दांचा विकासात शासकीय योजनांचे यशापयश.<br>**संतोष विठोबा गवई** | 184 |
| 55. | सामाजिकशास्त्राच्या संशोधनातील वस्तुनिष्ठता: एक चिकित्सक अध्ययन<br>**प्रा.डॉ.बामणे एम.एम.** | 186 |
| 56 | मराठवाडी बोली संशोधन : आवाहने व उपाय<br>डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले | 189 |
| 57 | आधुनिक संशोधन कार्यात ग्रंथपालाची भूमिका<br>**प्रा. बिडवे मारूती शिवाजी** | 192 |
| 58 | भारतीय लोकशाही समोरील प्रादेशिकतेची समस्या"<br>**प्रा. डॉ. शाम कदम** | 194 |
| 59 | सामाजिक संशोधनात अनुसूचीचे महत्त्व<br>**शिवकुमार उस्तुर्गे, पाटील सुलक्षणा भारत** | 197 |
| 60 | मराठवाड्यातील जलयुक्त शिवार अभियान : एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. भालेराव जे.के.** | 201 |
| 61 | ಸಂಶೋಧನೆಯಲ್ಲಿ ಕನ್ನಡ ಮತ್ತು ಮರಾಠಿ ಭಾಷಾ ಬೆಳವಣಿಗೆ<br>[illegible] | 204 |
| 62 | ؛ بند : مولانا الطاف حسین حالی<br>**Jagirdar Azra Shireen** | 209 |
| 63 | ولی دکنی کی لفظی کائنات<br>**MD.Minhajuddin** | 213 |
| 64 | جدید اردو غزل<br>**Dr,Hamid Ashraf** | 215 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 93
June 2019
UGC Approved No. 40705
Research Need of the Hour (संशोधन काळाची गरज)

# मराठवाडी बोली संशोधन : आवाहने व उपाय

**डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले**
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

आज जगातील कित्येक भाषा आणि बोली नष्ट होत आहेत. मृतप्राय ठरत आहेत.जागतिकीकरणाच्या रेटयात ग्रामीण संस्कृती आणि समाजजीवन प्रभावित झाले असून या दूरगामी परिणामामुळे संस्कृतीबरोबर भाषा व बोलीवर आक्रमणे होऊन भाषिक संक्रमण घडत आले.घडत आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये :**

1. बोली हा व्यक्तीच्या जगण्याचा एक जिवंत आविष्कार..ते संशोधन वेगाने व्हावे.
2. बोलीभाषेतून प्रादेशिक -सांस्कृतिकदृष्टया सामूहिक अस्मिता जोपासली जाते.
3. भाषाशास्त्रीय संशोधनात खूप मोठी पोकळी आहे.ती भरून निघावी.
4. साहित्यक्षेत्रात बोलीचा वापर लक्षणीय ठरत आहे. साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहामध्ये बोली हेच साहित्याचे महत्त्वाचे अंग बनले आहे, त्याचा शोध घ्यावा.
5. जागतिकीकरण आणि मराठी भाषा-मराठवाडी बोली व साहित्य यातील आंतरसंबंध जाणून घेणे .
6. मराठी भाषा -मराठवाडी बोली व साहित्य यावरील जागतिकीकरणाच्या प्रभावाची उकल करणे .
7. मराठी बोली- मराठवाडी बोली आणि साहित्य प्रवाह यांच्यावरील जागतिकीकरणाच्या प्रभावाचा मागोवा घेणे.
8. यांत्रिकीकरणामुळे निर्माण झालेल्या संदेश यंत्रणेचा (मराठी भाषे)मराठवाडी बोलीवरील परिणामाचा शोध घेणे.

**शोध निबंधाची गृहितके :**

1) जागतिकीकरणामुळे मराठवाडी बोलीभाषा प्रभावित झाली आहे.
2) जागतिकीकरणामुळे मराठवाडी भाषा व साहित्याच्या प्रचार आणि प्रसाराला गती दिली.
3) जागतिकीकरणाममुळे मराठवाडी भाषेच्या अंतर्बाहय स्वरुपात बदल घडवून आणला आहे.
4) प्रमाण मराठी व मराठवाडी भाषेचे स्वरूप कसे बदलले आहे, याची मीमांसा करणे.

**शोध निबंधाची मर्यादा :** प्रस्तुत शोधनिबंध हा जागतिकीकरणामुळे मराठी भाषा, मराठवाडी बोलीभाषा व साहित्य या अभ्यासकक्षेशी निगडित आहे. याशोधनिबंधात काही निवडक मराठवाडी बोली निरीक्षणे मध्यवर्ती मानली आहेत.

भारतामध्ये सन 1956 मध्ये भाषावार प्रांतरचनेला अनुसरून प्रादेशिक भाषांना सबंधित राज्यातील प्रमाणभाषेचा दर्जा मिळाला. परंतु 1 मे 1960 रोजी मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्र हे राज्य स्थापन झाले आणि मराठी भाषेला प्रमाण भाषेचा दर्जा मिळाला. तसेच राजभाषा अधिनियम 1963 अनुच्छेद 3(3) अन्वये करार, निविदा अथवा अन्य योजनासाठी हिंदी आणि इंग्रजी भाषेचा वापर करणे अनिवार्य केले. अलीकडे युती सरकारच्या काळात सर्व क्षेत्रातील कामकाजाची भाषा मराठीच राहील, असा अध्यादेश निर्गमित केला. परंतु वास्तवात त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी झालेली दिसत नाही. जागतिकीकरणामुळे व प्रसारमाध्यमांमुळे सामान्य माणसांना मराठी कधी हिंदीमय तर कधी इंग्रजीमय झालेली प्रत्ययास येते. पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या उर्दू-फारशी-फ्रेंच-पोर्तुगीज-डच व इतर शेजारी संपर्कभाषांचा प्रभाव मराठीवर आढळतो. जागतिकीकरणाच्या युगात संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट, दूरसंचार माध्यमातील वाहिन्या ,वृत्तपत्रे, नियतकालिके व साहित्य याप्रसारमाध्यमाशी संबंधित बाबींचा मराठवाडी ही मराठीची स्रोतभाषा असून सुद्धा सद्यःस्थितीत बोलीभाषा म्हणून तिची ओळख का नसावी? मराठी भाषेवरील नेमका प्रभाव कसा पडला आहे? पडत आहे? मराठवाडी भाषेचे स्वरूप कसे बदलले आहे? याबद्दलची ठळक निरीक्षणे यालेखात नोंदविण्यात येत आहेत.

**संशोधनाचे महत्त्व :**

1. भाषाशास्त्रीय संशोधन ही काळाची गरज आहे. आज बोलीविज्ञानाच्या माध्यमातून बोलीच्या अभ्यासाला चालना मिळत आहे. बोली हा माणसांचा उपजत अलंकार असून संभाषणातील सौंदर्य वृध्दिंगत करतो. प्रमाणभाषकांच्या समूहामध्ये अथवा अन्यत्र विनोद निर्मितीसाठी बोलीचे उपयोजन केले जाते.
2. चित्रपट, नाटक, सभा-संमेलन इत्यादी ठिकाणी परिणामकारक बोलीचा वापर केला जात आहे. रसिक -श्रोत्यांची मने जिंकून मनोरंजन आणि उद्‌बोधन घडविण्यासाठी बोली उपयोजन प्रभावी ठरते.
3. अभ्यासांपासून मराठवाडी बोली हा विषय दुर्लक्षित असून त्यास चालना मिळावी. त्यामुळे भाषाशास्त्रीय संशोधनातील पोकळी कमी करता येईल.
4. प्रमाण भाषा व बोली यापैकी कोणतीही श्रेष्ठ वा कनिष्ठ नसते. बोली हा सहजाविष्कार म्हणून खऱ्या अर्थाने तिच्यात जिवंतपणा असतो, ती माणसाच्या अंत:करणाची भाषा असते, तर भाषिकदृष्टया व्यापक समाज व्यवहाराचा विचार करता प्रमाणभाषेचे महत्त्वही कमी मानता येणार नाही.
6. मराठवाडयातील राजकीय,सामाजिक,सांस्कृतिक,ऐतिहासिक वाटचालीचा मागोवा घेण्यासाठी मराठवाडी बोलीच्या अभ्यासातून सुकरता येते. ( कारण सरंजामदार-वतनदार -अस्पृश्य समाजाच्या विशिष्ट लकबी प्रत्ययास येतात)

**जागतिकीकरणामुळे मराठवाडयातील बोलीभाषेवरील गंडातर :**

मराठवाडयातील जातीबोली सद्यपरिस्थितीमध्ये नष्ट होत आहेत. बलुतेदार व आलुतेदार यांच्या बोली कालप्रवाहात नष्ट होत आहेत. जागतिकीकरण-खाजगीकरण- औद्यागीकरण यांच्या प्रभावातून ग्रामीण व्यवस्थेचा कणा असलेल्या व्यावसायिकांच्या जगण्यावर गंडांतर आले. आधुनिकीकरणाच्या आघातामुळे परंपरागत व्यवसाय मोडकळीस निघाले. तसेच फॅशनच्या युगात गावातील व्यावसायिकांचे धंदे उध्वस्त झाले. स्वयंपूर्ण खेडयाची संकल्पना बदलली. गावातील माणसे उदर भरण्यासाठी जमेल आणि प्राप्त होईल ते काम करू लागले.परंपरागत व्यवसाय सोडून जीवन जगण्यासाठी नवीन मार्ग अनुसरल्यामुळे जुने व्यवसाय म्हणजे सामान्य लोकांची जगण्याची रीत बदलली. जन्मानुसार -जातीनिहाय पिढीजात प्राप्त झालेले व्यवसाय, त्याच्याशी संबंधित


२५

कामे, संबधित दैनंदिन व्यवहार आणि त्याकरिता उपयोगात असलेली बोली भाषा अडगळीला पडली. हळूहळू नष्ट होत ऱ्हास पावली . म्हणून जातीनुसार व्यवसाय ही संकल्पनाच पूर्णत: बदलून गेलेली आहे. नूतन व्यवसायातील कला- कौशल्य आत्मसात करून जगण्यासाठी विभिन्न व्यवसाय आणि त्याव्यवसायाशी निगडित संदेशनासाठी आवश्यक भाषा स्वीकारण्यात येत आहे. परंतु मराठवाडयात मागील कित्येक शतकापासून प्रचलित असलेल्या जातीय बोलीसंचित जे प्राचीन काळापासून येथील जातीनिहाय जगण्याचा अविभाज्य भाग बनले होते, ते आज बरेच नष्ट झाले आहे आणि काही प्रमाणात बोलीरूप अवशेष शिल्लक आहेत.

**१. मराठवाडयातील जातीबोली :**

जशी मराठवाडयाची संताची भूमी म्हणून ओळख आहे , त्याचप्रमाणे विविध धर्म-पंथ व जातीनिहाय माणसांचा, त्यांच्या भाषा-संस्कृतीचा मुक्त संचार घडतो. विविध जातीची माणसे आपले सांस्कृतिक संचित सांभाळत परस्परांशी गुण्यागोविंदयाने राहतात. एकमेकांच्या भाषिक अस्मिताही दुःखावणार नाहीत, यादृष्टीने सजग राहतात. त्यामुळे मराठवाडयामध्ये कित्येक जातीबोली अस्तित्वात आहेत. बंजारी, घिसाडी, कैकाडी, वडारी, पोवारी, वगैरे बऱ्याच जातीबोली आजही जिवंत आहेत. कित्येक जातीबोली नामशेष होत आहेत. बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार यांच्या जातीनिहाय प्राप्त व्यवसायाचे उच्चाटण होत आहे. यासंबंधित जातीमध्ये जन्मलेले अलिकडील काळातील माणसे पिढीजात व्यवसाय नाकारून उदरनिर्वाहासाठी नवीन व्यवसाय चालवित आहेत. परंपरागत कामाचे स्वरूप बदलले आहे. परिणामत: निजाम राजवटीच्या प्रभावातून रूढ बोलीभाषेमध्ये कमालीची स्थित्यंतरे आलेली आहेत. उथ. वतनदार- अस्पृश्य, दलित- सवर्ण, प्रस्थापित- विस्थापित इ. बोलीभेद धुसर होत आहेत, काळाच्या पडद्याआड जात आहेत. ग्रामीण तथा आदिवासी परिसरात आधुनिकीकरणाचे वारे वाहत आहे. परंपरागत जातीबोलीमध्ये संमिश्रता निर्माण होत आहे. उद्यागधंदे - कारखाने- नोकरी व नवनवीन व्यवसायांच्या संधीमुळे मानवी जीवन कमलीचे परिवर्तनीय बनले असून सामान्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग असलेली बोली हळूहळू वापरबाहय होत आहे. मृतप्राय होतच राहणार आहे.

**२. व्यावसायिकांची बोली** : प्रामुख्याने ग्रामीण पसिसरात व्यावसायिकांची बोली विशिष्टता आढळते. जात- समाज- पंथ निर्मितीमागे व्यवसाय उद्दीमाचे निकष परंपरेने चिटकविले. त्यामधून विशिष्ट व्यवसायाशी निगडित कामे आणि त्या कामाशी निगडित साधने निश्चित झाली. यामधून प्रत्येक समाजाची बोलीव्यवस्था (संदेशन प्रणाली) तयार झाली. बारा बलुतेदार आणि अठरा अलुतेदार हा ग्रामीण समाजरचनेचा कणा आहे. गावातील शेती व शेतकरी ,शेतीशी पुरक व्यवसाय करणाऱ्या समुदायातील लोकाची व्यवसायनिष्ठ बोली प्रचलित होती. बदलत्या कालप्रवाहात कित्येकांनी कर्तृत्वानुसार आपले अस्तित्व सिद्ध केले असून परंपरागत व्यवसाय आणि पर्यायाने बोली सोडून दिले आहेत.

**३. सामाजिक स्तरनिहाय विभिन्न बोलींचे प्रचलन :** समाजामध्ये व्यक्तीचा दर्जा हल्लीच्या काळात ज्यांच्या त्यांच्या कर्तृत्वावरून सिद्ध होत आहे. परंतु प्राचीन काळापासून मराठवाडयातील व्यक्तीचे स्थान पूर्वापार चालत आलेल्या रूढीने निश्चित होत असे. याप्रदेशातील काळी-पांढरी यांचे अभेद्य असे नाते होते. त्यास अनुसरून एका चाकोरीमध्ये भाषिक आदानप्रदान घडत आले. वंशपरंपरेने जीवन जगणाऱ्यांची बोली, सरंजामीवृत्तीने जीवन जगणाऱ्यांची बोली आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. सरंजामदार-जहागीरदार-वतनदार यांचे सामान्यजनांशी व अस्पृश्यांशी होत असलेले संदेशन ठराविक भाषाप्रणालीचे द्योतक होते. त्यासंवादातील भाषेचा रांगडेपणा आणि लाघवीपणा सामाजिक पर्यावरणात रूळलेला होता. मालक-नोकर यातील संभाषणाची भाषा ठरलेली होती. म्हणूनच वय, लिंग, कामे तथा व्यवसाय इ. सामाजिक स्तरनिहाय भाषिक लकबी, हेल व बोलण्याच्या सवयी तयार झाल्या होत्या.

**४. शैक्षणिक पर्यावरणामुळे परंपरागत जगण्याला (छेद) पुरोगामी दिशा :** स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाचे वारे वाहू लागले. खेडे-जंगल -दऱ्याखोऱ्यापर्यंत शैक्षणिक प्रसार झपाटयाने झाला. आणि त्यामुळे मागास परिसरातील माणसे प्रगती साधत आहेत. परिणामत: परंपरागत जगण्याला छेद देऊन पुरोगामी कार्यास दिशा मिळाली. परंतु मराठवाडयातील शतकानुशतके चालत आलेल्या बोली नेस्तनाबूत होत आहेत. त्यांचे उच्चाटण होत आहे. शेजारभाषा अथवा संपर्कभाषा यांच्या वाढत्या प्रभावामुळे बोलींचे संमिश्र रसायन निर्माण झालेले आहे. मराठी भाषा आणि तिच्या अंतर्गत प्रचलित बोलींचे रूढ स्वरूप वापरणे मागासलेपणाचे मानले जाते. त्यामुळे बोलीभाषांची पिछेहाट होत आहे.

**उपाययोजना :** १. बोली सर्वेक्षण व्हावे. बोली संकलन ही काळाची गरज.
२. लोकसाहित्याच्या चिरंतनत्वासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावेत.
३. परंपरागत व्यवसाय टिकणे महत्त्वाचे आहे.
४. पिढीजात अवशेषाचे अध्ययन करणे आवश्यक वाटते.
५. बोली शब्दकोशाची निर्मिती व्हावी .
५. बोली व्याकरण व्यवस्थेची मांडणी करणे आवश्यक आहे.
६. भाषाभ्यासकांनी पुढाकार घेऊन बोली जिवंत राहण्यासाठी कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे यांच्या आयोजनामधून जनजागृती घडवावी.
७.शासकीय स्तर व संस्थात्मक पातळीवरून प्रयत्न करण्यात यावेत. मराठवाडयातील भौगोलिकतेला अनुरूप बोली अध्ययन केंद्र कार्यान्वित करावे.
८. औद्योगीकरण व यांत्रिकीकरणाचा भस्मासूर रोखणे महत्त्वाचे ठरेल.
९. बोलीभाषा संशोधन प्रकल्पाला अनुदानाद्वारे प्रोत्साहन देण्यात यावे.

* Dist.Nanded *

**काही निरीक्षणे - निष्कर्ष :**

१. बोलीच्या अभ्यासामुळे कालप्रवाहात नष्ट होणारे बोलीसंचित चिरंतन ठरेल.
2. उच्चारण आणि लेखन यातील साधर्म्य साधता येईल.
3. व्याकरणिक नियमावलीत बदल घडवून उच्चारानुसारी लेखन करणे शक्य होईल.
4. व्यक्तीच्या बोलण्यातील विशिष्ट उच्चार-हेल-ढब यावरून त्याचे प्रादेशिक स्थान, सामाजिक (जात) अथवा सांस्कृतिक दर्जा, त्याचे कार्यक्षेत्रे याबद्दल ऐकणाऱ्यास आडाखे बांधता येतात.
5. वर्णनात्मक भाषाविज्ञानाच्या कसोटयाधारे संशोधनापासून वंचित राहिलेल्या मराठवाडी बोलीची उच्चारप्रक्रिया, वर्णप्रक्रिया, व्याकरणप्रक्रिया व प्रत्ययव्यवस्था सिध्द होईल.
6. वाक्यरचनेची वेगळिक, अर्थसंदेशनाची निराळी बाजू आणि पदप्रक्रिया यांच्या कसोटयाधारे मराठवाडी बोलीची मीमांसा करणे उचित ठरेल.
7. मराठवाडी बोली ही संदर्भसापेक्ष भाषा असून एकाच समानोच्चारी शब्दाचे - वाक्याचे अनेक संदर्भनिष्ठ अर्थ निर्माण होऊ शकतात.
8. जातिबोली, व्यवसायानुसार बोलीवैविध्य, धर्म, पंथ, समाज, समाजगट, वय, लिंग, प्रदेश, परिसर या घटकाशी संबंधित विविध मुखवटे धारण केलेली बोली आढळतात. त्यांच्यात जगण्याचे रंग-तरंग निर्माण झालेले आहेत.
9. मराठवाडी मराठी वाङ्मयामध्ये परिसरनिहाय जगण्याच्या प्रभावाचे आगळे पैलू टिपताना सभोवतीच्या सांस्कृतिक -सामाजिक -प्रादेशिक संदर्भांना गडद करताना बोली भाषेचा जाणीवपूर्वक वापर केला, होत आहे. आगामी काळात लेखनात वापर वाढावा, अशा साहित्यकृती बोलीदृष्टया- साहित्यदृष्टया मैलाचा दगड ठरत आहेत.
10. **दर बारा कोसावर बदलणारी बोली** खेडयातील व वनातील जगण्यातील वास्तव मुखर दर्शविणारी बोली हाच भविष्यकालीन साहित्याचे प्राणतत्त्व बनून येणे गरजेचे वाटते.
11. परभाषीय संक्रमण, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, संक्रमणातून घडलेल्या बोलीची ऐतिहासिकता शोधणे, जपणे आणि त्यास लिखितरूप देणे महत्त्वाचे वाटते.
12. बोली हा व्यक्तिजीवनाचा अलंकार आहे.'जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती' याप्रमाणे बोलीमध्ये व्यक्तिविशिष्टता आढळते. वास्तविक पाहता एखाद्या व्यक्तीच्या आवाजावरुन तो माणूस ओळखता येतो.
13. लोकसाहित्य संकलन -संशोधन करणे , मराठी साहित्य आणि समाजातील बोलीवास्तव जमा करणे व शास्त्रशुद्ध अभ्यास करणे हीच मराठवाडी बोली व इतर बोली जिवंत ठेवण्यासाठी मूलभूत प्रक्रिया आहेच. करिता बोली अभ्यासकांनी पुढाकार घेऊन मराठवाडी बोलीच्या अध्ययनासाठी संघटितपणे प्रयत्न करावेत, गती द्यावी, नष्ट होणारे बोलीवैभव सांभाळावे . पुढील पिढीकडे सुपूर्द करावे ! हीच अपेक्षा....



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded